# महाराष्ट्र मेट्रो रेल कॉर्पोरेशन लिमिटेड

## (पुणे मेट्रो रेल प्रकल्प )

---

## पुणे मेट्रोच्या दोन्ही मार्गिकांवर मेट्रो ट्रेन आणि स्थानक परिसरात सुरक्षा पर्यवेक्षक आणि कर्मचाऱ्यांकडून विशेष गस्त सुरू.



पुणे मेट्रोच्या दोन्ही मार्गिकांवर मेट्रो ट्रेन आणि स्थानक परिसरात सुरक्षा पर्यवेक्षक आणि कर्मचाऱ्यांकडून विशेष गस्त सुरू.

पुणे मेट्रोने आपल्या प्रवाशांच्या सुरक्षिततेला आणि शिस्तीला महत्त्व देत रामवाडी ते वनाझ आणि पिंपरी चिंचवड मनपा ते स्वारगेट या दोन्ही मार्गिकांवरील मेट्रो गाड्यांमध्ये विशेष गस्त सुरू केली आहे. मेट्रो प्रवाशांना सुरक्षित आणि सुखद प्रवास अनुभवता यावा यासाठी हा निर्णय घेण्यात आला आहे. दोन्ही मेट्रो मार्गिकांवर संबंधित स्टेशनवरील सुरक्षा पर्यवेक्षक (Security Supervisors) आणि त्यांच्यासोबत असलेले एक सुरक्षा कर्मचारी (Security Staff) मिळून ही गस्त घालणार आहेत.

या गस्तीचा मुख्य उद्देश मेट्रो गाड्यांमध्ये होणारे गैरवर्तन रोखणे हा आहे. यामध्ये प्रामुख्याने महिलांशी होणारे गैरवर्तन रोखणे, इतर प्रवाश्याचा उपहास करणे, मेट्रो ट्रेन मध्ये आणि स्थानक परिसरात कचरा करणे, मेट्रो ट्रेन मध्ये खाद्यपदार्थ खाणे/ भोजन करणे, आणि इतर कोणताही गैरवर्तन किंवा मेट्रो कायद्याशी विसंगत वर्तन थांबवणे यांचा समावेश आहे. दोन्ही मार्गिकांवर विविध स्थानकांदरम्यान दिवसातून किमान पाच ते सहा वेळा हे पथक नियमितपणे गस्त घालणं आहे. गस्तीवर असलेले सर्व कर्मचारी हे निश्चित गणवेशात असणार आहेत आणि आपल्या कार्यक्षेत्रात पूर्णपणे सतर्क राहतील. या गस्ती दरम्यान कोणीही प्रवासी गैरवर्तन करताना आढळ्यास त्याला मेट्रो नियमांनुसार दंड करण्यात येईल, पण गैरवर्तन हे कायदा सुव्यवस्तेच्या नियमाच्या आधीन असेल तर त्या व्यक्तीला संबंधित पोलीस स्टेशनच्या ताब्यात देण्यात येईल.

पुणे मेट्रो प्रशासनाने या विशेष अभियानामुळे मेट्रोमधील प्रवासादरम्यान शिस्त आणि सुरक्षिततेचे वातावरण अधिक चांगले होईल असा विश्वास व्यक्त केला आहे.